Impact Factor-8.632 (SJIF)

ISSN 2278-9308

Issue No

(CDLXVI) 471

Volume-B

# B.Aadhar

Single Blind Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

**March 2024**

## Cooperative Sector in India: Opportunities and Challenges




**Chief Editor**

**Prof. Virag S. Gawande**

**Director**

Aadhar Social Research & Development Training Institute, Amravati.

This Journal is indexed in :

- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : *www.aadharsocial.com*

Aadhar Publications

SL MAR - KSB




| | | |
|---|---|---|
| 21 | भारतातील सहकारी शेती —फायदे –दोष प्रा. डॉ फाजगे अंगद के. | 87 |
| 22 | सहकार क्षेत्रामध्ये जिल्हा मध्यवर्ती बँकेचे योगदान मोरे सपना गोविंद | 93 |
| 23 | सहकार क्षेत्रा पुढील आव्हाने व उपाय डॉ. जाधव विजु दत्तात्रय | 97 |
| 24 | सहकारी कृषी उद्योगातील नव उद्योजकता<br>प्रा. डॉ. भारत निर्वळ , रविंद्र भिकाजी भिसे | 103 |
| 25 | सहकार समृद्धी धोरणात संवादाची भूमिका : एक चिकित्सक अभ्यास<br>डॉ. नामदेव सानप | 107 |
| 26 | महाराष्ट्रातील सहकारी दुग्ध व्यवसायाची सद्यस्थिती :समस्या व उपाय<br>प्रा.डॉ.अनिल दिगंबर वाडकर | 117 |
| 27 | महाराष्ट्राच्या आर्थिक उभारणीत सहकाराचे योगदान प्रा.डॉ.बी.आर. शिंदे | 125 |
| 28 | सहकारी पतसंस्थासमोरील संधी आणि आव्हाने कोकरे हर्षकुमार विश्वनाथ | 128 |
| 29 | आर्थिक विकासात सहकाराची भूमिका - एक अभ्यास वर्षा सिताराम धुतमल | 132 |
| 30 | A Case Study of anImpact of E-Commerce In Supporting Small Businessesin India<br>***Dr. Phole Kamal Bhaurao*** | 136 |
| 31 | A Study of Maharashtra State Co-operative Bank: it's Problems and Remedies<br>**Dr. Rajesh Murlidhar Jadhav** | 141 |
| 32 | A Study on customer attitude& awareness towards E-commerce shopping apps with special reference to rural youth **Dr.Adkine S.B., Rotte Sai Akash** | 144 |
| 33 | Study of Women's Participation In Activities of Co-operative Housing Societies With Reference to Thane City.<br>**Asst.Prof. CA Atul A. Raut, Dr. H. S. Patange** | 151 |
| 34 | A Study Of Non-Performing Assets And Its Impact On The Banking System In India<br>**Suraj Digambar Bansode, Dr. B.T. Chavan** | 158 |
| 35 | Empowering Communities: Exploring Cooperative Entrepreneurship in India<br>**Asst. Prof. Sushil Madanrao Gangane** | 161 |
| 36 | सहकारी तत्वावरील भारतीय दुग्ध पदार्थ निर्मिती : एक चिकित्सक अभ्यास<br>सुदर्शन मधुकर मलकापुरे | 169 |
| 37 | आप्पासाहेब खोतांच्या कथेतील सहकार चित्रण आणि हतबल शेतकरी<br>प्रा.डॉ.विठ्ठल खंडुजी जायभाये | 173 |
| 38 | महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व सुधारणा डॉ. कल्याण गोलेकर | 177 |
| 39 | महिला सक्षमीकरणात सहकाराची भूमिका डॉ सुनिता आत्माराम टेंगसे | 183 |
| 40 | Farmer Producer Companies in Latur District: A Study<br>**Pavan V. Patil, Dr. Naresh V. Pinamkar** | 187 |

PBM - SRP

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B
ISSN : 2278-9308
March 2024

# महिला सक्षमीकरणात सहकाराची भूमिका

डॉ सुनिता आत्माराम टेंगसे,
समाजशास्त्र विभाग प्रमुख,कै. रमेश वरपुकर महाविद्यालय सोनपेठ, जिल्हा-परभणी.

**प्रस्तावना:**

सहकार या शब्दाचा शब्दशः अर्थ सहकार्य करणे होय.परस्परांच्या कामात मदत करणे आणि सर्वांचे हित साधण्यासाठी एकत्रित काम करणे म्हणजे सहकार होय. परस्परांच्या सहकार्यातून प्रयत्न करणे ही एक मानवाची आंतर प्रेरणा आहे, ज्यामुळे अडचण आणि आपत्तीच्या वेळी एकत्र राहणे, एकत्र काम करण्याने, एकमेकांना सहाय्य करणे ही वृत्ती माणसा मध्ये पहावयास मिळते. मानवी संस्थे ईतकेच सहकाराचे तत्व देखील प्राचीन आहे. या तत्त्वामुळेच मानव जातीचा विकास झालेला आहे .एखादे कार्य स्वतंत्रपणे किंवा स्वतः करण्यापेक्षा त्यात इतरांची मदत घेऊन ते अधिक चांगल्या प्रकारे आणि वेळेच्या आत आपण करू शकतो याची जाणीव मानवाला प्रारंभिक काळापासूनच झालेली आहे. त्यातून त्यांच्या आर्थिक आणि सामाजिक जीवनात विविध क्रांतिकारक बदल घडून आले आहेत मानव जेव्हा शिकारी अवस्थेत होता, तेव्हापासून ते आजच्या प्रगत अवस्थेपर्यंत घ्या मानवी जीवनाचा जेव्हा आपण विचार करतो तेव्हा असे आढळून येते की एकत्रित काम करणे, एकत्रित विचार करणे ही मानवाची सहज, उपजत आणि नैसर्गिक प्रवृत्ती आहे, त्यातूनच त्याला सुखी आयुष्य जगण्याची आणि सुखी जीवन निर्माण करण्याची प्रेरणा मिळाली आहे. सहकार हे मानवी सह जीवनाच्या कल्पनेची एक अशी प्रगत अवस्था आहे की, त्यामध्ये मानवास आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक विकासासाठी आणि अन्याय निवारणासाठी एकत्र येण्याची इच्छा निर्माण होते. ऑरिस्टॉटल या जगप्रसिद्ध तत्त्ववेत्याने म्हटले आहे की ,"मनुष्य हा सामाजिक प्राणी आहे." मानवाची समाजप्रियता कुटुंब, धर्म, व्यवसाय इत्यादी माध्यमातून वाढत असताना दिसते. मानवी जीवनात मानवी सहवासास अधिक महत्त्व आहे. अनेक व्यक्ती एकत्र येणे तसेच एकमेकांच्या अडचणी सोडवणे एकमेकास मदत करणे या क्रिया माणूस सहज करून लागला. मानवाप्रमाणे इतर प्राणी सुद्धा एकमेकांच्या सहवासात जीवन जगतात ही निसर्गाची सहज प्रवृत्ती आहे. सहकाराच्या मदतीशिवाय सुसंस्कृतपणाची भरभराट होऊ शकली नसती.आधुनिक संस्कृतीचा इतिहास म्हणजे खऱ्या अर्थाने सहकाराचा इतिहास आहे .कारण सहकार्य शिवाय आज जी वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक प्रगती दिसते ती शक्य झाली नसती. यावरून असे म्हणता येईल की "विना सहकार नाही उद्धार."

**शोध निबंधाचा उद्देश:**

*सहकार म्हणजे काय हे जाणून घेणे

*सहकाराचे मानवी जीवनावरील परिणाम अभ्यासणे

*सहकारा मुळे महिला सक्षमीकरणाला मिळणारी गती प्राप्त झाली का याचा अभ्यासणे

*सहकाराचे मानवी जीवनातील महत्त्व स्पष्ट करणे

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत शोधनिबंध लिखाणासाठी दुय्यम तथ्य संकलनातील पुस्तके, संदर्भ ग्रंथ, मासिके, साप्ताहिके, इंटरनेटच्या मदतीने शोधनिबंधाची मांडणी करण्यात आलेली आहे.

**गृहीतकृत्य:**

सहकारामुळे महिला सक्षमीकरणाला गती प्राप्त झाली आहे.

मानवसमूहात स्त्रीजातीचा जवळपास निम्मा हिस्सा आहे. स्त्रियांना हितोत्साहित करणारे वर्तन करून, त्यांचा जीवनस्तर उंचावण्याकडे दुर्लक्ष करण्यापासून ते त्यांचा छळ आणि अत्याचार करण्यापर्यंत अनेक प्रकारे हीनत्वाची वागणूक स्त्रीयांना मिळत राहिली आहे. हा भेदभाव दूर करून स्त्रियांच्या प्रगतीस पोषक वातावरणाची निर्मिती आणि त्याचे सुचालन करणे आणि लैंगिक समतेद्वारे (जेंडर इक्वॅलिटी) समाजाचे संतुलन साधणे यासाठी पुरोगामी आणि विवेकी समाजाने बाळगलेला दृष्टिकोन केलेली कृती यांचा समुच्चय म्हणजे स्त्री सक्षमीकरण, असे म्हणता येईल.

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal
Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B
ISSN : 2278-9308
March 2024

महिलांनी फक्त 'चूल आणि मूल' याकडेच लक्ष दिले पाहिजे असे अनेक जणांना वाटते, पण आता महिलांनी चुला आणि मुलासोबतच 'देश आणि विदेश' यांकडेसुद्धा लक्ष देण्याची गरज आहे.

मानवी हक्कांविषयी अनेक आंतरराष्ट्रीय करारांत मान्यता मिळूनही, स्त्रिया निर्धन आणि निरक्षर राहण्याचे प्रमाण मोठे आहे. वैद्यकीय सुविधा, मालमत्तेची मालकी, पतपुरवठा, प्रशिक्षण आणि रोजगारात पुरुषांच्या तुलनेत स्त्रियांना कमी संधी मिळते. त्या पुरुषांच्या तुलनेत राजकीयदृष्ट्या सक्रिय असण्याची शक्यता फारच कमी आहे, आणि त्या घरगुती हिंसाचाराचा बळी होण्याची शक्यता खूपच मोठी आहे. स्त्रियांची मानसिकता बदलणे हे अतिशय महत्त्वाचे आहे. ग्रामीण भागात स्त्रिया अजूनही स्वतः निर्णय घेऊ शकत नाहीत. तेथे त्या पुरुषांच्या निर्णयावर अवलंबून राहतात. त्यांची निर्णय क्षमता वाढणे गरजेचे आहे. घटनेने अनेक अधिकार दिलेले आहेत, याची माहिती त्यांच्यापर्यंत पोहचली पाहिजे, प्रबोधन झाले पाहिजे. स्त्री अजूनही १००% सक्षम आहे हे आपण मान्य करू शकत नाही.

महिला सक्षमीकरणाचे "3L" आहेत,ज्यात शिक्षण, श्रम आणि नेतृत्व यांचा समावेश आहे. शिकण्यामुळे स्त्रियांना अमर्यादित ज्ञान मिळण्यास मदत होते जे त्यांना त्यांचे विचार विस्तृत करण्यास मदत करते. महिलांना प्रतिकूल परिस्थितीवर मात करण्यास मदत करते. महात्मा गांधींच्या मते, "जर तुम्ही एखाद्या पुरुषाला शिक्षित केले तर तुम्ही एका व्यक्तीला शिक्षित कराल, परंतु जर तुम्ही एका स्त्रीला शिक्षित केले तर तुम्ही संपूर्ण कुटुंबाला शिक्षित कराल." एक प्रसिद्ध आफ्रिकन म्हण आहे: "जर तुम्ही एखाद्या मुलाला शिक्षित केले तर तुम्ही माणसाला प्रशिक्षित करता. जर तुम्ही मुलीला शिक्षित केले तर तुम्ही गावाला प्रशिक्षण देता.

स्त्री सक्षमीकरणा साठी लैगिक आरोग,नैसर्गिक साधनसंपत्तीची राखणावळ,आर्थिक सक्षमता,शैक्षणिक सक्षमता,राजकीय सक्षमता, ,मानसिक सक्षमता आवश्यकता आहे आणि महिला बचत गटाद्वारे महिलांचे होणारे वैयक्तिक, कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सक्षमीकरण होण्यास चालना मिळाली आहे याचा प्रत्यय येतो.

**महिलांची आर्थिक सबलीकरण स्थिती:**

भारतातील बहुसंख्य स्त्रिया या घरकामात गुंतलेल्या असतात. कमी उत्पादकतेची व कमी कौशल्याची कामे स्त्रियांकडे दिली जातात. म्हणून स्त्रियांना आर्थिक क्षेत्रात दुय्यम स्थान दिले जाते. महिलांचे आर्थिकदृष्ट्या सबलीकरण होण्याचे प्रमाण व वेग कमी आहे. महिला या उपजीविकेसाठी शेती, मजुरी, उद्योग, दुग्ध व्यवसाय, इ. क्षेत्रांत काम करत असतात, परंतु त्या कामाचे कधीच मोजमाप केले जात नाही. त्यामुळे आर्थिक सबलीकरणाला चालना मिळत नाही.

**महिला सक्षमीकरणाच्या योजना;**

महाराष्ट्र शासनाने १९९४मध्ये पहिले महिला धोरण जाहीर केले. त्यात कालसुसंगत बदल करत २००१ मध्ये दुसरे तर २०१४ मध्ये तिसरे महिला धोरण निश्चित केले गेले. या सर्व धोरणांमध्ये प्रामुख्याने स्त्रियांवरील अत्याचार, हिंसा, स्त्रीविषयक कायदे, त्यांच्या आर्थिक दर्जात सुधारणा, प्रसारमाध्यमांची भूमिका, स्वंयसेवी संस्थांचा सहभाग, स्त्रियांना केंद्रस्थानी मानून योजनांची निश्चिती, स्वंयसाहाय्यता बचतगटांचा विकास, मुद्रा योजना यांचा प्रामुख्याने विचार केला जातो. शासकीय-निमशासकीय यंत्रणांमध्ये स्त्रियांना नोकरीत ३० टक्के आणि स्थानिक स्वराज्य संस्थात ५० टक्के आरक्षण मिळते. महिला आर्थिक विकास महामंडळाच्या माध्यमातून, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाच्या माध्यमातून स्त्रियांना शिक्षण-प्रशिक्षणाच्या संधी उपलब्ध होतात.

**सहकारातुन बचत गट निर्मिती आणि महिला सक्षमीकरण:**

21 व्या शतकात भारत महासत्तेचे स्वप्न उरी बाळगून विकासाकडे घेणारे झेप घे त आहे.स्त्रीशक्तीचा50 टक्के वाटा अस्तित्वाने जरी असला तरी खरी कार्यशक्तीतूनच त्याची प्रचिती येऊ शकते. महिला बचत गट आज लाखोच्या घरात कार्यरत आहे. महिलांनी महिलांच्या विकासासाठी परस्पर समन्वयातून बचतीच्या माध्यमातून साधलेले एकत्रीकरण म्हणजे महिला बचतगट होतात यात स्वावलंबन, एकसारखी बचत समूहशक्ती या त्रिसुत्रीचा वापर केला जातो. महिलांचे सक्षमीकरण महिला बचतगटाने कसे साध्य केले याच्या खरं तर यशोगाथा अनेक वेळा आपण पहातो, ऐकतो अनुभवतो. स्त्रीचे सक्षमीकरण टप्प्याटप्प्याच्या प्रक्रियेवर आधारीत आहे. 1)मानसिक सक्षमीकरण 2)आर्थिक सक्षमीकरण 3)सामाजिक सक्षमीकरण 4)राजकीय सक्षमीकरण एका वेळेची खाण्याची भ्रांत असलेल्या

B.Aadhar' Peer-Reviewed & Refereed Indexed Multidisciplinary International Research Journal

Impact Factor -(SJIF) -8.632, Issue NO, (CDLXVI) 471 -B

ISSN : 2278-9308 March 2024

सावकारशाहीच्या कर्जात बुडालेल्या महिलांनी बचत गटात सहभागी होऊन आता आपल्या गरिबीवर मात केली आहे.महिला स्वयं-सहायता गट
ही एक जागतिक घटना आहे जी नेहमीच विविध प्रकारे अस्तित्वात असते. हे नेटवर्क वैयक्तिक स्वास्थ्य (आत्म-सन्मान, एजन्सी, आत्मविश्वास) आणि सामूहिक कृतीसाठी एक व्यासपीठ प्रदान करतात. गटात काम करणाऱ्या महिला एकमेकींना ऊर्जा देतात, प्रोत्साहित करतात.जेव्हा स्त्रिया भेटतात तेव्हा त्या एकत्र काम करतात आणि जेव्हा त्या एकत्र काम करतात तेव्हा त्यांना स्वतःसाठी आणि त्यांच्या समाजासाठी आशा निर्माण होऊ लागतात. आशेच्या सामर्थ्याने, स्त्रिया स्वतःला आणि इतर स्त्रियांना पाहतात.

समर्थन गट हे स्वयंसेवी गट असतात, सहसा 15-25 लोकांचे बनलेले असतात, जे लहान व्यवसाय वाचवण्यासाठी आणि स्वतःला आणि त्यांच्या समुदायासाठी फरक करण्यासाठी साप्ताहिक भेटतात. SHGs मूलभूत गृहीतकेवर आधारित आहेत की जेव्हा व्यक्ती अडथळयांवर मात करण्यासाठी एकत्र येतात आणि सामाजिक बदल साध्य करण्यासाठी कृती करतात, तेव्हा त्याचे परिणाम वैयक्तिक आणि गट सक्षमीकरणावर होतात .सशक्तीकरन होताना अनेक सकारात्मक परिणामांचा पाया घातला जात आहे., ज्यात चांगले प्रशासन, राजकीय बदल आणि आर्थिक वाढ सक्षम करणारे वातावरण तयार होते. जसजसा गट परिपक्व होतो तसतसे, SHG सदस्य नवीन गटांना प्रोत्साहन देऊ लागतात आणि अशा पद्धतीने एक महिला दुसऱ्या महिलेस प्रोत्साहित करून एक प्रकारे महिला सक्षमीकरणाची साखळी तयार होत असल्याची अनुभूती येते.

भारतातील सहकार क्षेत्राचा विचार करता महिला सहकारी संस्थामध्ये बरीचशी यशस्वी सहकारी संस्थांची उदाहरणे पाहावयास मिळतील. माणदेशी महिला सहकारी बँकेकडे आपल्याला महिला सहकारी संस्थेचे यशस्वी उदाहरण म्हणून पाहता येईल. लाखो महिला सूक्ष्म उद्योजिकांना यशस्वीरीत्या आपला व्यवसाय वाढविता यावा आणि आपल्या कुटुंबात व समाजात त्यांना मान मिळावा या दृष्टीने पोषक वातावरण निर्माण करण्याचे कार्य माणदेशी महिला सहकारी बँक सातत्याने आपल्या ८ शाखांच्या माध्यमातून करीत आहे.महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित बंगळूर, या संस्थेची १९५९ साली स्थापना झाली. ही संस्था विधवा, अपंग व बेरोजगार महिलांसाठी उत्तम कार्य करते.

सेवा सहकारी संस्था, अहमदाबाद, महिला सुपर बझार, आंध्र प्रदेश, महिला सहकारी बँकिंग संस्था, आंध्र प्रदेश, महिला विकास, आंध्र प्रदेश, निपाणी वडगाव पत संस्था, महाराष्ट्र, महिला सहकारी बँक, आंध्र प्रदेश यांसारख्या यशस्वी महिला सहकारी संस्था देशात कार्यरत असून, त्यांच्यामार्फत महिला सबलीकरण व सक्षमीकरणाचे काम अव्याहत सुरू आहे. सहकार क्षेत्रात अशा संस्थांच्या संख्येत वाढ होण्याची आवश्यकता आहे. भारतात महिलांच्या मालकीचे ३० लाखांपेक्षा जास्त उद्योग असून, वर्षाला ११ टक्के या वेगाने वाढत चाललेल्या सूक्ष्म-उद्योग क्षेत्रामध्ये रोजगारनिर्मिती करण्याची क्षमता महिला सहकारी संस्थामध्ये आहे.

**सारांश:**

महाराष्ट्र सहकार विकास महामंडळाचे विविध उपक्रम आहेत त्यात प्रामुख्याने महिला सहकारी संस्थामध्ये डिजिटल साक्षरतेचा प्रसार आणि ग्रामीण महिलांना कॅशलेस अर्थकारण शिकवून त्याचा फायदा करून घेण्यास साह्याची गरज आहे. महिला सूक्ष्म-उद्योजकांना आपले व्यवसाय पुढील स्तरावर घेऊन जाण्यास मदत करण्याच्या दृष्टीने तसेच त्यांना कर्ज उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने महिला सहकारी संस्था, शेतकरी उत्पादक कंपन्या यासारख्या संस्थांची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने राज्यस्तरावर सहकार व पणन विभागांतर्गत महाराष्ट्र सहकार विकास महामंडळ कार्यरत असून, महिला सहकारी संस्थांच्या चळवळीला पाठिंबा देण्याच्या अनुषंगाने महामंडळामार्फत नियोजन करण्यात येत आहे. जागतिकीकरणानंतर सहकार क्षेत्रास बहुराष्ट्रीय कंपन्यांशी करावी लागणारी स्पर्धा, व्यावसायिक कौशल्यांचा अभाव, साधन संपत्तीची मर्यादा यांसारख्या गंभीर आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. या स्पर्धेमध्ये महाराष्ट्रामध्ये सहकार क्षेत्रात विविध सहकारी संस्था कार्यरत राहण्यासाठी त्यांचे बळकटीकरण आणि सक्षमीकरण होणे आवश्यक होते. त्यांना सुधारित तंत्रज्ञानाची ओळख करून देणे, उद्योग वृद्धीसाठी मार्गदर्शन करणे, आर्थिक वृद्धी होण्यासाठी,उपलब्ध नवीन संधीचा लाभ मिळवून देण्यासाठी एका समन्वय एजन्सीची गरज होती. याकरिता महाराष्ट्र

सहकार विकास महामंडळाची स्थापना झाली. ही शासनाची कंपनी आहे. सद्यःस्थितीत सहकारी संस्थेबरोबरच, शेतकरी उत्पादक कंपन्या व महिला बचत गट यांनाही विविध प्रकारच्या सेवा महामंडळामार्फत देण्यात येतात. शिक्षित आणि अल्पशिक्षित महिलांना लघू व गृहउद्योगाच्या माध्यमातून आत्मनिर्भर बनवून त्यांचा आर्थिक स्तर उंचावण्यासाठी बचतगटांच्या माध्यमातून महिलांचा आर्थिक स्तर उंचावण्याबरोबरच रोजगार निर्मिती करून इतर महिलांचे सक्षमीकरण करण्यास बचत गट पूरक ठरत आहेत.बचत गटामध्ये काम करणाऱ्या महिलांचे कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक सक्षमीकरण वेगाने होत आहे. कौटुंबिक सामाजिक व्यावसायिक व औद्योगिक पातळ्यांवर महिला निर्णय घेत असून त्यांच्यामध्ये असणारा नेतृत्वगुण विकसित होत असल्याचा प्रत्यय येत आहे.

संदर्भ:

1.डॉ. बिरादार, सहकार, विद्या बुक्स पब्लिशर औरंगाबाद, 2014,पान न.1

2.मोहन सराफ, ना.मा आचार्य,सहकार, मेहता पब्लिशिंग हाऊस पुणे, 1992,पान नं.6,7

3.https://mr.m.wikipedia.org/wiki

4.https://agrowon.esakal.com/

5.https://marathizatka.com

6.https://byjus.com/free-ias-prep/women-empowerment/

7.https://hi.m.wikipedia.org/wiki

8.https://unacademy.com/content/cbse-class-11/study-material/introduction-to-small-industry

---